28

क्र. एकत्रा/एस.आर.३४/क-१/८३. 2443
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि
अभिलेख [म. राज्य] पुणे यांचे कार्यालय.
पुणे, दिनांक :- १४-१०-१९९३.

परिपत्रक
==========

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
तक्रारी अर्जाबाबत.....

राज्यातील एकत्रीकरण योजनेच्या अंमलबजावणीच्या कामास दिनांक १-४-९३ पासून शासनाने स्थगिती दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील अधिसूचना क्रमांक का/एल.आर.४/सी-१/९३, दिनांक २६-३-९३ नुसार कांही सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांची कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणेत आलेली आहेत. तसेच एकत्रीकरण योजनेवरील तक्रारी अर्जाचा निपटारेकामी सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांची कार्यालये संबंधी जिल्ह्यांच्या मुख्यालयांत ठेवणेत आलेली आहेत. या कार्यालयाकडील दि. २६-३-९३ चे अधिसूचनेद्वारे स्थलांतरीत करणेत आलेल्या कार्यालयाकडील कागदपत्राचा / तक्रारी अर्जाचा कार्यभार संबंधी जिल्ह्यांच्या मुख्यालयांत कार्यरत असलेल्या स.ए.अ.यांचेकडे देणेबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत.

स्थलांतरीत केलेल्या स.ए.अ. कार्यालयाकडील तक्रारी अर्जाचा आढावा घेता ब-याचशा प्रकरणांत अपूर्णता आढळून आलेली आहे. निदर्शनास आलेल्या त्रुटी खालीलप्रमाणे आहेत.

[अ] कांही तक्रारी अर्ज प्रकरणांत संबंधीत स.ए.अ.यांनी तारखा नेमून संबंधीत खातेदारांचे जबाब नोंदविलेले आहेत. परंतु संबंधीत स.ए.अ.यांनी जबाबावर "समोर" म्हणून स्वाक्षरी केलेली नाही, अगर स्वाक्षरी खाली तारीख नमूद केलेली नाही.

[ब] कांही तक्रारी अर्ज प्रकरणांत एकत्रीकरण आस्थापनेकडून मोजणी काम केले जाते. परंतु त्यातील "अ" मोजणी आलेखामध्ये मोजणी क्षेत्राच्या हद्दी पेन्सीलीने ठेवलेल्या आहेत. भूमि अभिलेखाचे आधारे क्षेत्राच्या हद्दी शाईने रंगविलेल्या नाहीत. आलेखावर गांवचे नांव, तालुका, जिल्हा परिमाण, टिपण मोजणी दिनांक, मोजणी करणाराचे नांव व हुद्दा नमूद नाही, भूमापकाची स्वाक्षरी नसते. तर स.ए.अ.यांनी जागेवर मोजणी कामाची तपासणी केली असलेस त्यासंबंधीचा दाखला त्यांचे दिनांकित स्वाक्षरीने आलेखावर ठेवला जात नाही,

..२/-

धारिकेत मोजणीपूर्व खातेदारांना दिलेल्या नोटीसीची प्रत सामील केलेली नसते.

तसेच अभिलेख दुरुस्तीकामी जंगल गुणाकार बुकावर संबंधीत खातेदारांच्या स्वाक्षऱ्या नसतात. गुणाकार बुकातील क्षेत्राचे रकाने रिक्त ठेवलेले असतात. गुणाकार बुकावर संबंधीत भूमापकाचे नांव व स्वाक्षरी नसते.

प्रस्तुत परिपत्रकाद्वारे सर्व स.ए.अ.यांना सूचना देणेत येते की, त्यांना अन्य एकत्रीकरण कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारी अर्ज प्रकरणांची स.ए.अ.यांनी व्यक्तिश: पडताळणी करावी व वरीलप्रमाणे मुद्यांची प्रत्येक प्रकरणांत पूर्तता झालेली आहे अगर कसे याची खात्री करावी.

सर्व स.ए.अ.यांनी सदरची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीमध्ये दि.३०-१०-९३ पूर्वी पूर्ण करणेची आहे. पूर्तता अहवाल दि.१५-११-९३ रोजी इकडील कार्यालयास सादर करून त्याची प्रत नियंत्रण अधिकारी व संबंधीत उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करणेची आहे. पूर्तता अहवालासोबत सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना अन्य कोणते कार्यालयाकडून किती प्रकरणे मिळाली त्याचे सविस्तर पत्रक सादर करणेचे आहे.

सर्व स.ए.अ.यांना सुचीत करणेत येते की, त्यांना तक्रारी अर्ज प्रकरणांत जर वरील मुद्याप्रमाणे अपूर्णता आढळून आल्यास प्रथमत: संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेशी संपर्क साधून १० दिवसांत पूर्तता करून घ्यावी. स.ए.अ.यांनी सदर अपुरे कामाची पूर्तता करणारे अधिकारी / कर्मचारी यांना अपुरे कामाची पूर्तता करणेसाठी मंजूर दिवस किंवा प्रवास भत्ता देय असणार नाही. वेळेत पूर्तता न करणारे अधिकारी / कर्मचारी यांचेबाबतचा सविस्तर अहवाल आपले नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत इकडे सादर करावा. अहवालासोबत सोबतचे नमुन्यांमध्ये माहिती भरून सादर करावी. तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अपूर्णता राहिलेली आहे त्यासंबंधीच्या खालील कागदपत्रांच्या नकलाही जोडाव्यात.

[१] संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या संबंधीत महाचा दैनंदिनीचा उतारा.

[२] संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे संबंधीत महाचे प्रवासभत्ते देयकाची नक्कल.

[३] संबंधीत अपूर्ण जबाबाची झेरॉक्स प्रत.

[४] संबंधीत अपुरे नकाशाची नक्कल.

सदरचा प्रस्ताव प्रत्येक अधिकारी/कर्मचारी निहाय स्वतंत्र देणेचा आहे.

..३/-

नियंत्रण अधिकारी यांनी त्याचे अधिनस्थ सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून उपरोक्त त्रुटीसंबंधी अहवाल प्राप्त झालेस त्याबाबत प्रकरणांची छाननी करून प्रकरणाची पूर्तता होणेचे दृष्टीने स. ए. अ. यांना आपले स्तरावर सूचना देणेच्या आहेत. तसेच प्रकरणात अपूर्णता ठेवणारे अधिकारी / कर्मचा-याविरूध्द शिस्तभंग कार्यवाहीचा प्रस्ताव चालू करावा व तसा अहवाल इकडे सादर करावा.

नियंत्रण अधिकारी यांनी अशा प्रकारची प्रकरणे मिळालेपासून एका सप्ताहांत त्यांचेकडील कार्यवाही पूर्ण करणेची आहे.

नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी सदर परिपत्रकानुसार दिनांक १५-११-९३ अखेर कार्यवाही पूर्ण केली जाईल याकडे वैयक्तिक लक्ष देणेचे आहे.

स्थळप्रतीवर मा.ज.आ. पुणे,
यांची स्वाक्षरी असे.

सही/-xxx
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म.राज्य] पुणे,
यांचे करिता.

प्रतिलिपी :- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] / नियंत्रण अधिकारी [सर्व] / सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी [सर्व] यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतिलिपी :- सहाय्यक जमाबंदी आयुक्त [सर्व] यांना माहितीसाठी.

प्रत :- कार्यासन अधिकारी [सर्व] [एकत्रीकरण विभाग] जमाबंदी आयुक्त कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.

प्रत :- सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी [गांवठाण] सर्व / सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी [शहर] / सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी [पुर्नलेखन] सर्व यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

—०—